


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । सोमवार, दि. २८ ऑक्टोबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ३० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२



# पवारांचे धक्कातंत्र!

# सिद्धी कदमांना मोहोळची उमेदवारी

## २६ इच्छुकांची नाराजी, क्षीरसागर करणार का बंडखोरी?

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी


राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवारांची तिसरी यादी रविवारी (ता.२७) जाहीर झाली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ९ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. यामध्ये मोहोळ विधानसभेच्या जागेवर शरद पवार गटाने सर्वांना आश्चर्यचकीत करणारी उमेदवारी जाहीर करत धक्कातंत्र वापरलं आहे. या मतदारसंघाच्या उमेदवारीसाठीचे प्रबळ दावेदार असलेले संजय क्षीरसागर, राजू खरे रमेश कदम यांच्यासह २६ जणांना बाजूला सारुन माजी आमदार रमेश कदम यांच्या कन्या सिद्धी कदम यांना उमेदवारी देऊन 'दे धक्का' दिला आहे. मात्र, दुसरीकडे माढा आणि पंढरपुरात अद्याप सस्पेंन्स कायम आहे. या मतदारसंघात कोणाला उमेदवारी मिळणार? याबाबत तर्क वितर्क लढवले जात आहेत.

### सिद्धी कदमांची 'अशी' आहे ओळख



- सिद्धी कदम या माजी आमदार रमेश कदम यांच्या कन्या
- सिद्धी कदम या २६ वर्षाच्या
- आतापर्यंत जाहीर झालेल्या सोलापुर जिल्ह्यातील उमेदवारापैकी सर्वात तरुण उमेदवार
- सिद्धी यांचं शिक्षण टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्समधून झालंआहे.
- त्या एका एनजीओ मध्ये देखील काम करतात.
- २०१९ च्या निवडणुकीत वडील तुरुंगात असताना त्यांनीच प्रचार यंत्रणा सांभाळली होती

### पित्याच्या अडचणीसाठी कन्येचा पर्याय



माजी आमदार रमेश कदम हे अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ घोटल्याप्रकरणी तुरुंगात होते. त्या इमेजचा फटका बसू नये म्हणून कदाचित सिद्धी कदम यांना उमेदवारी दिल्याची चर्चा सुरु आहे. त्यावेळी अपक्ष असलेल्या रमेश कदम यांना २५ हजार मतं मिळाली होती. रमेश कदम यांच्यावर असलेला ठपका पाहता शरद पवार गटाने सिद्धीला संधी दिल्याचे दिसत आहे. रमेश कदम जामिनावर बाहेर आहेत. त्यांचा आगामी काळात जामीन रद्द झाला तर अडचण होऊ शकतो, म्हणून सिद्धीचा पर्याय निवडण्यात आल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

### अपक्ष लढण्यासंबंधी क्षीरसागरांकडून चाचपणी





मोहोळमधून शरद पवार गटाकडून अनेकजण इच्छुक होते. त्यामध्ये प्रामुख्यानं संजय क्षीरसागर, राजू खरे यांची नावे आघाडीवर होती. तसेच लक्ष्मण ढोबळे यांच्यासह त्यांचे पुत्र अभिजित ढोबळे, त्यांच्या कन्या कोमल ढोबळे या देखील इच्छुक होत्या. मात्र, अशाचत सिद्धी यांचे नाव अचानक जाहीर केल्याने मोहोळमध्ये बंडखोरी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संजय क्षीरसागर बंडखोरी करुन अपक्ष निवडणूक लढवू शकतात. सोमवारी (ता.२८) उमदेवारी अर्ज सादर करणार आहोत, अपक्ष लढण्यासंबंधी समर्थक कार्यकर्त्यांसोबत विचारविनिमय सुरु झाले आहे. आमदार यशवंत माने यांना फॉर होणारीच उमेदवारी सिद्धी कदम यांची वाटते. उमेदवारीत तडजोड झाली का अशीही शंका येते. ऐन वेळी माझी उमेदवारी कापण्याचे कारण कळले नाही. आम्ही लढू, असे संजय क्षीरसागर म्हणाले.

### पवारांनी शब्द फिरवला

राष्ट्रवादीत फाळणीनंतर झाल्यानंतर मोहोळमधील नेतेमंडळींनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत जाणं पसंद केलं. त्यावेळी आख्या तालुक्यात शरद पवारांच्या गटात जायला कोणं तयार नव्हतं. शरद पवारांच्या गटाचा एकही नेता नव्हता. त्यावेळी संजय क्षीरसागर यांनी भाजप सोडून लोकसभा निवडणुकीपूर्वी शरद पवार गटात खुद्द शरद पवारांच्या उपस्थित प्रवेश केला. मध्यस्ती श्री विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांच्यासमोर क्षीरसागर यांच्या प्रवेशाची चर्चा झाली होती. मोहोळ मतदार संघाची उमेदवारी मागायला खुद्द राजन पाटील हे आले तरी तुम्हालाच उमेदवारी देऊ, असं अभिवचन शरद पवारांनी दिलं होतं. पुढं क्षीरसागरांनी अनेक वेळा शरद पवारांची भेट घेतली त्यावेळी क्षीरसागरांना उमेदवारीबद्दल पवार सकारात्मक बोलायचे. पण शेवटी उमेदवारीत क्षीरसागारांना पवारांनी भयावह दिला.

### एक नजर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवारांच्या तिसऱ्या यादीवर..




कारंजा– ज्ञायक पाटणी, हिंगणघाट– अतुल वामदिले, नागपूर हिंगणा– रमेश बंग, अणुशक्तीनगर– फहाद अहमद, चिंचवड– राहुल कलाट, भोसरी– अजित गव्हाणे, बीड माजलगाव– मोहन बाजीराव जगताप, परळी– राजेश देशमुख, मोहोळ– सिद्धी रमेश कदम.

### आता पंढरपूर अन् माढ्याच्या धक्कातंत्राबद्दल चर्चा

मोहोळच्या जागेवर अत्यंत अनपेक्षित चेहरा शरद पवारांनी आणला. त्याप्रमाणं अनिर्णित ठेवलेल्या पंढरपूर आणि माढ्याच्या जागेवर कोणते वेगळे चेहरे शरद पवार आणून एकदम धक्कातंत्र देतील, याबद्दलची मोठी चर्चा रंगली असून त्याबद्दलचं औत्सुक्य वाढलं आहे.

# पंढरपुरात भालके, 'दक्षिण'मध्ये दिलीप माने! 'मध्य' रिकामेच!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

माजी आमदार दिलीप मानेंसह समर्थकांनी दक्षिण विधानसभा मतदार संघाच्या उमेदवारीसंबंधी डरकाळ्या फोडल्याचे तीव्र परिणाम काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये उमटले. मानेंच्या उमेदवारीच्या अनुषंगाने, रातोरात हालचाली झाल्या. मानेंची या मतदार संघातील राजकीय ताकद अन् त्यांच्या नेतृत्वाचा भविष्यात पक्षाला होणार फायदा आणि उमेदवारी टाळल्यास समर्थकांचा पक्षाला कायम पत्कारावा लागणारा रोष हे लक्षात घेऊन काँग्रेसनं अखेर नमती भूमिका घेत दिलीप माने यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केलं.

दरम्यान, हे करताना काँग्रेसने पंढरपूर विधानसभेची जागादेखील स्वत:कडे घेतली. स्व. भारत भालके यांचे सुपुत्र भगिरथ भालके यांना उमेदवारी जाहीर केली आहे. पंढरपूरची जागा राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे घेतली जाणार यासंबंधी मोठा बोलबाला झाला होता. भालके यांनी शरद पवार गटाकडे उमेदवारीसाठी जोरदार प्रयत्न केले होते.

मात्र, महाविकास आघाडीच्या जागा वाटपाच्या तहामध्ये पंढरपूरच्या जागेसंबंधी वाटाघाटी झालेल्या दिसत नाहीत. काँग्रेसने या जागेवर दावा सांगितला होता. त्यानुसार, महाविकास आघाडीमधील मित्र पक्ष काँग्रेसला ही जागा कायम ठेवण्याला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटानं संमती दिल्याचं दिसते. त्यातून मुळची पंढरपूरची काँग्रेसची जागा याच पक्षाकडं राहिल्याचं रविवारी (ता.२७) जाहीर झालेल्या काँग्रेसच्या यादीवरुन स्पष्ट होतं. काँग्रेसने १४ उमेदवारांची तिसरी यादी प्रसिद्ध केली, त्यामध्ये माने आणि भालकेंच्या उमेदवारीचा समावेश आहे.

## 'दक्षिण'मध्ये मैत्रीपूर्ण लढत होणार की शिवसेना माघार घेणार?

### शहर मध्यचा राहिला सस्पेंन्स

काँग्रेसनं रविवारी जाहीर केलेल्या यादीत सोलापूर शहर दक्षिण आणि पंढरपूर या दोन जागेच्या उमेदवारांचा समावेश आहे. तर यापूर्वीच्या काँग्रेस उमेदवारांच्या घोषणेत अक्कलकोटचं नाव आलेलं आहे. सोलापूर शहर मध्यच्या जागेचा विषय केवळ मागे राहिला आहे. इथली जागा महाविकास आघाडीच्या जागा वाटपात माकपला सुटेल असंदेखील रविवारी मानलं जात होतं. ही जागा काँग्रेस स्वत:कडं ठेवणार की माकपला देणार ? यासंबंधीचा सस्पेंन्स अजून तरी राहिला आहे.

### शिवसेना उमेदवार पाटलांचं काय?

सोलापूर शहर दक्षिणच्या जागेवर उद्धव ठाकरे शिवसेनेच्यावतीने अमर पाटील यांना उमेदवारी दिली आहे. त्याच जागेवर काँग्रेसने माजी आमदार दिलीप माने यांना उमेदवारी घोषित केली आहे. त्यातून इथं पेच निर्माण झाला आहे. कोणत्याही परिस्थितीत माघार नाही, अशी भूमिका ठाकरे सेनेची दक्षिणच्या जागेसंबंधी आहे. त्यांची ही असलेली टोकाची भूमिका आणि काँग्रेसने जाहीर केलेली उमेदवारी हे पाहता पुढे काय होणार? हा मुद्दा महत्त्वाचा आहे. ठाकरे सेनेने या जागेवरुन निवडणूक लढवण्याचा निर्णय कायम ठेवल्यास मैत्रीपूर्ण लढत या मतदार संघात होऊ शकते. अमर पाटील यांच्या उमेदवारीसंबंधी शिवसेनेचे पक्ष श्रेष्ठी पुन्हा काय वेगळा निर्णय घेतील काय? हेदेखील पाहावं लागणार आहे.

### माढा राहिला निर्णयाविना

बहुचर्चित मोहोळ आणि पंढरपूरचं जागा वाटप आणि उमेदवारीचा विषय रविवारी मिटला. या दोन्ही ठिकाणच्या उमेदवाऱ्या महाविकास आघाडीकडून घोषित झाल्या. मात्र, माढ्याची जागा निर्णयाविना मागे राहिली. राष्ट्रवादी शरद पवार गटानं या जागेवर दावा सांगितला आहे. या मतदार संघातून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुकदेखील मोठ्या संख्येने आहेत. शरद पवार गटाकडून सोमवार (ता.२८) या मतदार संघाचा निर्णय होऊ शकतं, असं सांगण्यात आलं. महायुतीच्या उमेदवारीचं या मतदारसंघाचं घोडं अडलं आहे.

### माळशिरसला 'फिरसे' सातपुतेच

माळशिरस मतदार संघाच्या भाजप उमेदवारीसंबंधी खूप खल झाला आहे. विद्यमान आमदार राम सातपुतेंच्या उमेदवारीला खुद्द भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांचा मोठा विरोध होता तरीपण हा विरोध बाजूला सारत पक्षश्रेष्ठींनी आमदार सातपुतेंनाच पुन्हा उमेदवारी निश्चित केल्याची माहिती भाजपच्या वरिष्ठ सुत्रांकडून रविवारी दैनिक 'सुराज्य' मिळाली.

# आघाडीत बिघाडी! दक्षिण, सांगोला, परंड्यात मैत्रीपूर्ण लढत?

✔ सोलापूर/प्रतिनिधी

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाआघाडीच्या उमेदवार याद्या जाहीर होत आहे. यामध्ये काँग्रेस आणि उबाठामध्ये बिघाडी होण्याची चिन्हे दिसत आहेत. दक्षिण सोलापूर, भूम-परंडा आणि सांगोला या तीन मतदारसंघात काँग्रेस आणि ठाकरे गटाने उमेदवार दिले आहेत. त्यामुळे आता या मतदारसंघातून माघार कोण घेणार की येथे मैत्रीपूर्ण लढत होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या तिन्ही मतदारसंघाबाबती उद्धव ठाकरे यांची भूमिका महत्वाची राहणार आहे.

ठाकरे गटाने सर्वात प्रथम यादी जाहीर करून दक्षिणमधून अमर पाटील, सांगोल्यातून दिपक आबा साळुंखे पाटील तर भूम-परंड्यातून राहुल पाटील यांना उमेदवारी जाहीर केली. मात्र आता यातील दक्षिणच्या जागेवर काँग्रेसने, परंड्याच्या जागेवर शरद पवार गटाने तर सांगोल्यातील जागेवर शेकापने उमेदवार जाहीर केला आहे. त्यामुळे या तिन्ही जागांवर पेच निर्माण झाला आहे. या तिन्ही जागेवर ठाकरे गटानेच उमेदवार मागे घ्यावेत अशी मागणी काँग्रेस, पवार गट आणि शेकापमधून होत आहे. या तिन्ही जागेवरील उमेदवार मागे घेण्याने ठाकरे गट बॅक्फूटवर जाण्याची शक्यता आहे. दक्षिण आणि सांगोल्यातून ठाकरे गटाने उमेदवारी माघारी घेतल्यास ठाकरे गटाकडे जिल्ह्यात केवळ बार्शीचीच जागा राहणार आहे. हे ठाकरे यांना मान्य होणार का असा प्रश्न आहे. त्यामुळे या मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढतीची शक्यता वर्तवण्यात येत आहे. महाआघाडीचे वरिष्ठ नेते यावरून बसून चर्चा करून निर्णय घेणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र ४ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज काढून घेण्याच्या दिवसापर्यंत ही काथाकूट चालण्याची शक्यता आहे. आता या तीन मतदारसंघाबाबत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि खा.संजय राऊत काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पवार काय 'सरप्राईज' देणार? अजितदादा त्यावर उमेदवार ठरवणार



अजित पवार



अॅड. मीनल साठे



पृथ्वीराज सावंत

✔ सोलापूर/प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवारीवरुन लक्षवेधी ठरलेल्या माढ्यातून शरद पवार गटाच्या संभाव्य उमेदवाराला टक्कर देण्यासाठी अजित पवार गटाचा कोणता सक्षम चेहरा निवडला जाईल, याबद्दलचं औत्सुक्य वाढलं असून धडाकेबाज अजित पवार इच्छुकांमध्ये कोणाच्या नावावर उमेदवारीची मोहर उमटविणार? हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा झाला असून महायुतीकडून कोणता चेहरा रिंगणात येणार? यावर महाविकास आघाडी पर्यायानं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट बारीक नजर ठेवून आहे.

### माढ्याचा सस्पेन्स कायम

महायुतीच्या जागा वाटपामध्ये मोहोळबरोबरच माढ्याची जागा अजित पवार राष्ट्रवादी गटाला सोडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या जागेवर तगडा उमेदवार देण्यासंदर्भात खुद्द अजित पवार आणि सुनील तटकरे यांच्यामध्ये चर्चा झाल्याचंदेखील कळतं.

माढ्याच्या जागेसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्यावतीनं आमदार बबनराव शिंदे, रणजितसिंह मोहिते-पाटील, अॅड. मिनल साठे, अभिजित पाटील यांच्यासह अन्य इच्छुकांची नावे उमेदवारीसाठी शरद पवारांच्या विचाराधीन आहेत. या इच्छुकांपैकी एका सक्षम उमेदवारासोबत अजित पवार राष्ट्रवादी गटाला टक्कर द्यावी लागणार आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून देण्यात येणाऱ्या उमेदवारासोबत टक्कर देण्यासाठी माढ्याच्या नगराध्यक्ष अॅड.मिनल साठे, रयतक्रांती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष प्रा. सुहास पाटील, सार्वजनिक आरोग्यमंत्री मंत्री प्रा.डॉ. तानाजी सावंत यांचे पुतणे पृथ्वीराज सावंत, जिल्हा परिषद समाज कल्याण समितीचे माजी सभापती शिवाजी कांबळे हे इच्छुक असून त्यांनी अजित पवारांकडे उमेदवारीसाठी सेटिंग लावली आहे.



### शरद पवारांच्या धक्कातंत्राच्या चेहऱ्यांत पुन्हा रणजितदादा

मोहोळच्या जागेवर शरद पवारांनी चर्चेच्या अन् अंदाजाच्या पलिककडे जाऊन उमेदवार दिला. त्यानंतर माढ्यातदेखील शरद पवार यांचं उमेदवारीत धक्कातंत्र देतील, असं मानण्यात येत आहे. धक्कांतंत्रातून आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचंदेखील नाव माढ्यासाठी सिल्व्हर ओक वर्तुळात रविवारी (दि. २७) होतं. त्या तुलनेत अजित पवारांकडून उमेदवारी दिला जाऊ शकतो.